N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): परभणी　　P.S.(ठाणे): पठारी

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0098　　Year (वर्ष): 2024

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):23/02/2024 18:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): शुक्रवार　　Date From (दिनांक पासून): 23/02/2024

Time Period (कालावधी): पहर 4　　Date To ( दिनांक पर्यंत): 23/02/2024

Time From (वेळेपासून): 12:13 बजे

Time To (वेळेपर्यंत): 12:13 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 23/02/2024　　Time (वेळ): 18:12 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):

Entry No. (नोंद क्र.): 028

Date & Time (दिनांक आणि वेळ): 23/02/2024 18:12 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 01 किमी　　Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): पाथरी शहरातील तहसिल,कार्यालयासमोरील पोर्चच्या डाव्, बाजुस असलेल्या निळ्या पाण्याच्य,तापाथरी जिपरभणी

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): नामदेव ज्ञानोबा वाघमारे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा गुंज खुर्द,ता पाथरी, जि परभणी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा गुंज खुर्द,ता पाथरी, जि परभणी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9511898047

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल देविदासराव कदम | | | 1. रा जिजाउ नगर, जिंतुर रोड,, परभणी, ता जि परभणी ,पठारी, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 04 नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** **UIDB Number**
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 23/02/2024.

मी नामदेव ज्ञानोबा वाघमारे, वय 29 वर्शे, व्यवसायः शेती रा. गुंज (खुर्द), ता. पाथरी, जि. परभणी. मोनं. 9511898047.

समक्ष पोलीस स्टेशन पाथरी, जि. परभणी येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून शेती करतो. मी ए.सी.बी. कार्यालय परभणी येथे दि.22/02/2024 रोजी तक्रार दिली की, गुंज (खुर्द) शिवारातील माझे वडीलांचे नावे असलेले शेत गट क्र 129 क्षेत्र हेक्टर 00.52 आर, गट क्र. 130 क्षेत्र हेक्टर 00.70 आर, गट क्र. 133 क्षेत्र 01 हेक्टर 30 आर पोटखराब आर 07 क्षेत्रापैकी काही जमीन माझा भाउ सतीष वाघमारे व माझे स्वतःचे नावे वाटणीचे स्मरणपत्राव्दारे तसेच माझी आई गिताबाई वाघमारे यांचे नावे असलेले शेत गट क्रमांक 133 क्षेत्र 00.83 आर मधील क्षेत्रापैकी काही जमीन माझे नावे व उर्वरीत जमीन आईचे नावे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 85 प्रमाणे वाटणी करणेकामी दि. 16/06/2023 रोजी मा. तहसीलदार यांचे नावाने तहसील कार्यालय, पाथरी येथे माझे आईचे व वडीलांचे नावे मी अर्ज दिला होता. त्यानंतर माझे कुटूंबीतील सर्वांनी मा. तहसीलदार पाथरी यांचे समोर हजर राहून आम्हाला वाटणी मंजूर असल्याबाबत कळविले. त्यावर मा. तहसीलदार पाथरी यांनी माझे, माझा भाउ व आईच्या नावे वाटणी प्रमाणे शेतजमीनीचे वाटप होउन फेरफार करणेबाबत जानेवारी महिन्यात तलाठी, सज्जा गंुज खु. यांच्या नावे आदेश दिला. तो आदेश मी दि.25/01/24 रोजी तलाठी श्री कदम साहेब, सजा बाभळगाव अतिरीक्त चार्ज गंुज खु. यांना नेवून दिला असता ते मला म्हणाले की, मी सध्या मराठा समाज सर्वेच्या कामात व्यस्त आहे. तुम्ही पुढच्या महिन्यात 3/4 तारखेला या. पण चहापाण्याला काहीतरी द्यावे लागेल. त्यावेळी त्यांनी तो आदेश त्यांचेकडे ठेवून घेतला. त्यानंतर मी त्यांनी सांगितलेल्या तारखेस त्यांचेकडे जावू शकलो नाही.

दि.13/02/24 रोजी मी माझे मोबाईल वरून तलाठी कदम यांना फोन करून माझे फेरफारचे काम झाले का असे विचारले असता त्यांनी मला "या ना तुम्ही इकडे भेटायला तुम्हांला सगळ फुकटच व्हाव वाटतेय" असे म्हणून लाचेची मागणी केली.

एकंदरीत वाटणीपत्रावरून मा. तहसीलदार, पाथरी यांनी दिलेल्या आदेशान्वये वाटप झालेल्या शेत जमीनीचे फेरफारचे काम करण्यासाठी तलाठी कदम हे "चहा पाण्याला पैसे द्या"तुम्हांला सगळ फुकटच व्हाव वाटतेय" असे म्हणुन लाचेची मागणी करीत आहेत. मी माझे कामानिमित्त आज दि. 22/02/24 रोजी भेटणार आहे. भेटी दरम्यान त्यांनी मला कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्याचेवर कायदेशिर कार्यवाही करावी. अशी लेखी तक्रार दिली होती तसेच त्यापुर्वी सकाळी ऑनलाईन देखील तक्रार दिली होती.

त्यावरून पोनि श्री. जकिकोरे, एसीबी परभणी यांनी तात्काळ 1) श्री गोविंद माधवराव सलगर व 2) श्री रोशन नाना खंडारे यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. पंचाना मी तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. त्यानंतर मी, दोन्ही पंच, व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे एसीबी कार्यालयातील शासकीय वाहनाने सापळ्याकरीता लागणारे सर्व साहीत्यासह मानवत मार्गे पाथरी शहराच्या अलिकडे काही अंतरावर असलेल्या कॅनालच्या बाजुने जाणा-या कच्च्या रस्त्याच्या अडोशाच्या ठिकाणी पोहचलो. तेथुन तलाठी कदम साहेब यांना फोन व्दारे संपर्क साधला असता त्यांनी मला अर्ध्या तासाने पाथरी शहरातील शिक्षक कॉलनी येथील हनुमान मंदिरा शेजारील त्यांचे खाजगी कार्यालयात येण्यास सांगितल्याने त्यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जावून भेट घेण्याचे ठरले.

दि. 22/02/2024 रोजी 15.08 ते 16.10 वाजेपर्यंत करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 गोविंद सलगर असे व्हाईस रेकॉर्डरसह तलाठी कदम साहेब यांना भेटण्यास पाथरी शहरातील शिक्षक कॉलनी येथील हनुमान मंदिरा शेजारील त्यांचे खाजगी कार्यालयात गेलो. तेथे माझी व तलाठी कदम साहेब यांची पंच क्र. 01 गोविंद सलगर यांचे समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान तलाठी कदम यांच्यासोबत माझे कामासंबंधी चर्चा झाली

त्यादरम्यान त्यांनी मला नमुना नंबर 09 ची नोटीस दिली व त्यावर माझे आई व वडीलांची सही घेवुन नोटीस परत आणुन देण्यास सांगीतले. त्यांनतर त्यांनी मला"द्या ना चिल्लर पाणी" असे म्हणाले असता मी त्यांना किती असे विचारले तेंव्हा ते सुरवातीस" द्या दहा पाच हजार" असे म्हणाले त्यावर मी किती पाच हजार का दहा हजार असा म्हणालो असता त्यांनी "दोन हजार द्या, तुमचे हजार आणि बंधुचे हजार. " असे म्हणुन शेतीच्या सातबाराला फेर ओढण्याकरीता 2,000/- रू लाचेची मागणी पंचासमक्ष केली व नोटीस सोबत लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतले. पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे व तलाठी कदम यांचे पंच क्र. 1 सलगर यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा सापळा अधिकारी यांनी केलेला आहे.

त्यानंतर लागलीच सापळा अधिकारी यांनी तलाठी कदम यांचेवर सापळा आयोजीत केला. तलाठी कदम यांनी मला पडताळणी कार्यवाहीवेळी 2,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी 2,000/- रू ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या चार नोटा लाच म्हणुन देण्याकरीता पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सापळा अधिकारी यांनी सुचना दिल्या. तसेच अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या 2,000/- रू ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या 04 चलनी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझेकडे देवून व्हाईस रेकॉर्डरसह मला व पंच क्र. 1 गोविंद सलगर यांना तलाठी कदम यांना लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांचे शिक्षक कॉलनी येथील खाजगी कार्यालयात पाठविले. आमचे पाठोपाठ सापळा पथक निघाले. आम्ही तलाठी कदम यांचे खाजगी कार्यालयाजवळ पोहचताच सापळा पथक आमच्यावर लक्ष ठेवून आजुबाजूला थांबले.

मी व पंच क्र. 1 गोविंद सलगर असे तलाठी कदम यांचे शिक्षक कॉलनीतील खाजगी कार्यालयासमोर गेलो तेंव्हा त्यांचे कार्यालय बंद होते. त्यामुळे मी तलाठी कदम यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी फोनवर"निघालो मी परभणीला, जाऊद्या उद्या भेटुत, नोटीसवर सहया घेऊन उद्या या" असे म्हणाले. तलाठी कदम यांनी उद्या भेटण्याकरीता कळवील्याने सापळा कार्यवाही स्थगित करून उद्या दि. 23/02/2024 रोजी तलाठी कदम यांची भेट घेवून सापळा आजमाविण्याचे सर्वानुमते ठरले. या कार्यवाही बाबतचा पंचनामा सापळा अधिकारी यांनी केला आहे. तसेच मला उद्या दि. 23/02/2024 रोजी सकाळी फोन करून कळविलेल्या ठिकाणी येण्यास सांगीतले.

दि. 23/02/2024 रोजी सकाळी सापळा अधिकारी श्री. जकिकोरे यांनी मला फोन करून पाथरी मानवत रोडवरील पोखर्णी फाटयाजवळील तुळजाई दुध डेअरी समोरील खुल्या मैदानात येण्यास सांगीतलेवरून मी तेथे गेलो. तेथे उभे असलेल्या शासकीय वाहनामध्ये दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस निरीक्षक श्री. जकिकोरे यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच काल पोह/भुमकर यांनी प्रात्येक्षीक करून दाखविल्याप्रमाणे आज पुन्हा प्रात्यक्षीक करून दाखविले व मी काल हजर केलेल्या 2,000/- रूपयांना ( ज्यामध्ये 500/- रू दराच्या 04 चलनी नोटा) पोह/भुमकर यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावून तलाठी कदम यांना देण्यासाठी माझे अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिष्यामध्ये व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 गोविंद सलगर असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणापासुन माझे मोटारसायकलने तलाठी कदम यांना लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह 11.38 वाजता निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक शासकीय वाहनाने निघाले. मी व पंच क्र. 1 सलगर तलाठी कदम यांच्या शिक्षक कॉलनी येथील खाजगी कार्यालयात पोहोचलो. तेथे त्यांचे कार्यालय बंद असल्याने मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला तहसील कार्यालय, पाथरी येथे येण्यास कळविले. त्यावरून मी व पंच क्र. 01 सलगर असे तहसील कार्यालय, पाथरी येथे पोहोचलो. सापळा पथक आमच्या पाठोपाठ आले व तहसिल कार्यालयाचे आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले.

मी माझी मोटार सायकल तहसिल कार्यालयाचे गेटसमोर उभी करून तलाठी कदम यांना फोन केला असता तलाठी कदम यांची तहसिल कार्यालयासमोरील पोर्चच्या डाव्या बाजुस असलेल्या निळया पाण्याच्या टाकीसमोर भेट झाली. त्यावेळी मी त्यांना आई वडीलांची सही झालेली नोटीस दिली असता त्यांनी "द्या इथच, कोन पाहिलय" असे म्हणुन पैशाची मागणी केल्याने मी तुम्ही सांगीतल्याप्रमाणे दोन हजार रूपये आणलेत असे म्हणुन माझेकडील दोन हजार रूपये दिले असता पंच क्र. 01 सलगर यांच्या समक्ष तलाठी कदम यांनी 2,000/- रूपये लाच रक्कम स्विकारून स्वतःच्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिष्यात ठेवली. त्यावेळी मी त्यांना माझे काम करण्यास सांगुन सापळा पथकास दिसेल अशा प्रकारे स्वतः चे गळयामधील वायरलेस ब्ल्युटुथ हेडफोन डाव्या हातात घेवुन वर खाली करून पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ तहसिल कार्यालया समोर आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले व सापळा पथकाने तलाठी कदम यांना ताब्यात घेतले व 12.13 वा. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यांनतर सापळा पथक तलाठी कदम यांना तहसिल कार्यालयामधील, महसुल

विभागातील, नायब तहसिलदार (निवडणुक) यांच्या कक्षात घेवुन गेले व तेथे त्यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या शर्टच्या खिष्यातुन लाच रक्कम 2,000/- रुपये काढुन दिले. सदर 2,000/- रूपयांच्या नोटांवर व तलाठी कदम यांच्या उजव्या हातावर अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाष टाकला असता नोटांवर व तलाठी कदम यांच्या उजव्या हाताच्या बोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर सापळा अधिकारी यांचे सुचनेनुसार पंच क्रमांक 02 खंडारे यांनी त्या नोटा स्वतःकडे घेतल्या. सदर नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री जकिकोरे साहेबांनी तलाठी कदम यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव अनिल देविदासराव कदम, वय 43 वर्शे, पद - तलाठी, सज्जा बाभळगाव अतिरीक्त पदभार गुंज (खुर्द), ता. पाथरी, जिल्हा परभणी. रा. जिजाउ नगर, जिंतुर रोड, परभणी, ता. जि परभणी असे सांगितले.

दि. 22/02/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे मी दिलेल्या तक्रारीवरुन त्याच दिवशी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही वेळी अनिल देविदासराव कदम, वय 43 वर्ष, पद - तलाठी, सज्जा बाभळगाव अतिरीक्त पदभार गुंज (खुर्द), ता. पाथरी, जिल्हा परभणी. रा. जिजाउ नगर, जिंतुर रोड, परभणी, ता. जि. परभणी यांनी आमच्या वाटणीपत्रावरुन मा. तहसीलदार, पाथरी यांनी दिलेल्या आदेशान्वये माझे, माझा भाउ व आईच्या नावे वाटप झालेल्या शेत जमीनीचे फेरफारचे काम करण्यासाठी 2,000/- रूपये लाचेची मागणी करून दि. 23/02/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पाथरी शहरातील तहसिल कार्यालयासमोरील पोर्चच्या डाव्या बाजुस असलेल्या निळ्या पाण्याच्या टाकीसमोर पंच क्रमांक 01 सलगर यांचे समक्ष 12.13 वाजता 2,000/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे.

माझी फिर्यादि माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे. फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shankar umakant patwari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): shankar umakant pa
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):

API
पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. ...ी.जि.परभणी

एक प्रत मिळाली